“एकल पालक कुटुंबांचे समाजशास्त्रीय अध्ययन : विशेष संदर्भ नांदेड शहर”

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या मानव विज्ञानशाखे अंतर्गत
‘समाजशास्त्र’ विषयातील पीएच्.डी. (विद्यावाचस्पती) पदवीसाठी
सादर करावयाचा संशोधनपूर्व आराखडा

:: संशोधक ::

साईनाथ सटवाजी कुंभारे

:: संशोधक मार्गदर्शक ::

प्रो. डॉ. ए. टी. शिंदे

विभागप्रमुख, समाजशास्त्र विभाग,
इंदिरा गांधी वरिष्ठ महाविद्यालय, सिडको, नवीन नांदेड

संशोधन केंद्र
सामाजिक शास्त्रे संकुल,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

ऑगस्ट 2023

“एकल पालक कुटुंबांचे समाजशास्त्रीय अध्ययन : विशेष संदर्भ नांदेड शहर”

---

1. प्रस्तावना :

भारतीय हिंदू समाजामध्ये विवाहाला पवित्र स्थान देण्यात आलेले आहे. विवाहासंबंधी धार्मिक विधींना अत्याधिक महत्त्व दिले जाते. पूर्वीच्या काळी कुटुंब म्हणजे एकमेकांशी नाते असलेल्या माणसांचा समूह होता. माणसा-माणसांमधील नाती ही जन्मानंतर, विवाहानंतर किंवा दत्तक घेतल्यानंतर निर्माण होतात. कुटुंबसंस्था एकत्र अथवा विभक्ती अशा दोन्ही प्रकारची असू शकते. विभक्त कुटुंबसंस्था त आई-वडील, पती-पत्नी, मुलगा-मुलगी असे प्राथमिक नाते असतात. एकत्र कुटुंब पद्धतीत इतर दुय्यम नातेसंबंधाचा देखील अंतर्भाव होतो. (उदा. काका-काकू, चुलत भाऊ-बहीण) साधारणत: पुरुष (वडील) हा कुटुंबाचा प्रमुख असतो. म्हणूनच त्यांना कुटुंबांचा कणा, आधारस्तंभ असे देखील म्हटले जाते. ‘कुटुंबसंस्था’ ही सार्वभौम संस्था असली तरी समाजात तिचे स्वरूप बदललेले दिसते. आधुनिक समाजामध्ये ज्या प्रकारची कुटुंबपद्धती प्रचलित आहे त्या पद्धतीशी सुसंगत अशी सांस्कृतिक लक्षणे, स्थायी भाव, कल्पना इत्यादी बाबी कुटुंबात दिसतात.

1.1 आप्तसंबंधावर आधारीत कुटुंबाचे प्रकार :

अ) प्राथमिक कुटुंब :

प्राथमिक कुटुंब हे सर्व समाजात आढळून येते. या कुटुंबामध्ये प्रामुख्याने पती-पत्नी व त्यांची अविवाहित किंवा दत्तक मुले यांचा समावेश होतो. म्हणजेच

पती-पत्नी, माता-मुलगा, बहीण-भाऊ, आणि बहिणी-बहिणी या नातेसंबंधाचा, व्यक्तींचा केंद्र कुटुंबात समावेश होतो.

ब) विस्तारीत कुटुंब :

विस्तारीत कुटुंबात रक्तसंबंधी संतानोत्पत्तीचा आणि विवाहासंबंधामुळे निर्माण झालेल्या अशा सर्वच व्यक्तींचा समावेश होतो. या समाजातील विस्तारीत कुटुंबाची सदस्य संख्या अधिक प्रमाणात असते.

1.2 सदस्य संख्येवर आधारीत कुटुंबाचे प्रकार :

ज्याप्रमाणे सदस्य संख्येच्या आधारावर विवाहाचे विस्तारीत आणि प्राथमिक असे दोन प्रकार पडतात. त्याचप्रमाणे विवाहाच्या आधारावर देखील कुटुंबाचे विविध प्रकार पडतात.

अ) एकविवाह कुटुंब :

"या विवाह प्रकारामध्ये 'पती व पत्नीची' विवाहाच्या वेळी स्त्री व पुरुषांची संख्या एक-एक असते. त्यांच्या वैवाहिक संबंधाद्वारे जे कुटुंब निर्माण होते त्यास एक विवाह कुटुंब असे म्हणतात." पती-पत्नी जिवंत असेपर्यंत कोणालाही दुसरा विवाह करता येत नाही.

ब) बहुपती कुटुंब :

"अनेक पुरुष जेंव्हा एकाच स्त्रीबरोबर विवाह करून कुटुंब निर्माण करतात तेंव्हा त्या कुटुंबास बहुपती कुटुंब असे म्हणतात." या कुटुंबातील सर्व सदस्य एकाच घरी राहतात.

क) बहुपत्नी कुटुंब :

“यामध्ये एक पुरुष अनेक स्त्रियांबरोबर विवाह करतात. त्या कुटुंबास बहुपत्नी कुटुंब असे म्हणतात.”

1.3 वंश व सत्ता आधारीत कुटुंब पद्धती किंवा प्रकार :

त्याचप्रमाणे वंश व अधिसत्ता यांवर आधारित कुटुंबाचे विविध प्रकार पडतात. यामध्ये मातृसत्ताक कुटुंब पद्धती व पितृसत्ताक कुटुंब पद्धती असे दोन प्रकार पडतात.

अ) मातृसत्ताक कुटुंब पद्धती :

“ज्या कुटुंब पद्धतीमध्ये अधिसत्ता स्त्रीकडे असते व वंश ही तिच्याच नावाने चालतो. त्या कुटुंबाला मातृसत्ताक कुटुंब पद्धती असे म्हणतात.”

ब) पितृसत्ताक कुटुंब पद्धती :

“ज्यामध्ये कुटुंबाची अधिसत्ता पुरुषाकडे अधिक प्रमाणात असते. अधिसत्ता व वंश पुरुषाच्याच नावाने चालतो. त्यास पितृसत्ताक कुटुंब पद्धती असे म्हणतात.”

1.4 कुटुंब संकल्पनेचे बदलते स्वरूप :

आधुनिक युगातील बदलत्या काळानुसार कुटुंब संकल्पनेतसुद्धा बदल झालेला दिसून येतो. सद्य:स्थितीत अनेक देशात अविवाहित जोडप्यांनी एकत्र राहणे ही सर्वसामान्य बाब झाली आहे. एवढेच नाही तर याचे प्रचलन दिवसें दिवस वाढत आहे. एकमेकांच्या सहवासात राहणाऱ्या अविवाहित जोडप्यांना अनेक बाबतीत विवाहित जोडप्यांसारखे अधिकार मिळत नाहीत. उदाहरणच द्यायचे झाल्यास,

जीवन विमा किंवा आरोग्य विम्यासारख्या अनेक सामाजिक विमा योजना लग्नाशी जोडलेल्या आहेत. नातेसंबंधांना कायदेशीर आधार असल्याशिवाय आणि विखुरलेली नाती एकाच कुटुंबाचा भाग आहेत, याचा पुरावा दिल्याशिवाय अविवाहित जोडप्यांना सामाजिक सुरक्षा मिळवण्यात अडचणी येतात.

त्याचवेळी जगातील अनेक भागात एकूण मनुष्यबळांमध्ये महिलांचा सहभाग सातत्याने वाढत आहे. मात्र, एकंदर आढावा घेतल्यास महिलांच्या करिअरचा प्रवास छोटा असून तो जास्त अडथळ्यांचा असतो. महिलांचे उत्पन्न पुरुषांपेक्षा कमी असते. बरेच काम त्या विना मोबदला करतात. शिवाय, जास्तीत जास्त प्रमाणात त्या असंघटित क्षेत्रात कार्यरत असतात. कौटुंबिक कर्मचारी म्हणून योगदान देत असतात. सामाजिक सुरक्षेला रोजगाराशी जोडून पाहायचे झाल्यास पुरुषांच्या तुलनेत महिलांना खूपच कमी सुरक्षा कवच मिळते. शिवाय, व्यक्तिगत योगदानाचा भाग म्हणून व्यक्तीच्या संपूर्ण हयातीत त्यांना मिळणाऱ्या पेन्शनसारख्या योजनांचा महिलांना फारसा उपयोग होत नाही. कारण संपूर्ण करिअरच्या काळात महिलांना या योजनांमध्ये तुलनेनं कमी योगदान दिल्या जाते.

जगातील सर्वच देशांत पुरुषांच्या तुलनेत महिलांना निवृत्ती वेतनाचा लाभ कमी मिळतो. हेच यातून दिसते. इतकेच नव्हे, या साऱ्या बाबीमुळे महिलांची बचत आणि संपत्ती संचय पुरुषांशी तुलना करता कमी दिसतो. सर्व घटकांचा एकत्रित विचार केल्यास महिलांना जेमतेम सामाजिक सुरक्षा मिळते. याउलट, सुरक्षेसाठी त्या कुटुंबांमध्ये इतरांवर अवलंबून असलेल्या दिसतात. त्यामुळे सामाजिक सुरक्षेसाठी दुसऱ्यांवर अवलंबून असलेला एक नवाच वर्ग तयार होतो. त्याचबरोबर वाढत्या घटस्फोटामध्ये व लग्न न करता मुले दत्तक घेण्याच्या नव्या पद्धतीमुळे अनेक घरांमध्ये एकल माता-पिता हा ट्रेण्ड वाढीस लागला आहे. उत्पन्न व गरिबीच्या बाबतीत अशा कुटुंबांमध्ये पारंपरिक कुटुंबापेक्षा अधिक जोखीम असते.

पालकांचा रोजगार दर, उत्पन्नाच्या स्त्रोतांची उपलब्धता आणि वारसा हक्क व वैवाहिक संपत्ती कायदा हे महत्त्वाचे घटक एकल पालकांच्या कुटुंबाच्या आर्थिक परिस्थितीमध्ये निर्णायक भूमिका बजावतात. एकल पालक कुटुंब आणि आई-वडील दोन्हींचा समावेश असलेल्या पारंपरिक कुटुंबाच्या सामाजिक सुरक्षेच्या गरजा वेगवेगळ्या असतात. या दोन्ही कुटुंबाच्या अडचणींचे स्वरूप वेगळे असते. त्यांच्यासाठी पूर्णपणे स्वतंत्र आर्थिक व अन्य प्रकारच्या धोरणात्मक उपायांची गरज आहे.

एकल माता-पित्यांच्या कुटुंबासाठी परवडणारी घरे आणि बालसंगोपन, भरपगारी रजा, लहान मुलांच्या पालनपोषणासंबंधीच्या योजना अत्यंत महत्त्वाच्या ठरतात. कुटुंबाच्या गरजांना अनुसरून अशा सामाजिक सुरक्षेच्या उपाययोजना राबवण्यासाठी कुटुंब व्यवस्थेत होत जाणारे बदल समजून घेणे अत्यंत महत्त्वाचे आहेत.

1.5 एकल पालक कुटुंब संकल्पना :

“एकल पालक” एखाद्या जोडीदाराच्या मदतीशिवाय एकट्याने मुलांचे किंवा मुलींचे संगोपन करण्याची जबाबदारी घेतात, त्याला एकल पालक कुटुंब असे म्हणतात. हे एकल पालक कुटुंब हे कमीत कमी एका मुलाद्वारे बनले आहे आणि त्यांचे पालनपोषण माता किंवा पिता करतात. आधुनिक काळात बहुसंख्य देशामध्ये एकल पालक ही संकल्पना वाढीस लागली आहे. एकल पालक ही संकल्पना 19 व्या शतकाच्या मध्यापासून अस्तित्त्वात आलेली दिसून येते. एकट्या व्यक्तीने दत्तक धेतलेल्या मुलांचे संगोपन एकट्याने करता जोड्यांमध्ये केले जात असेल. ऑस्ट्रेलियामध्ये 2003 मध्ये 14% एकल पालक कुटुंबे होती, न्युझीलँड मध्ये 2013 च्या जनगणनेनुसार 17.8% कुटुंबे एकल पालक होती. युनायटेड किंगडममध्ये चारपैकी एक कुटुंब एकल पालक कुटुंब आहे. त्यापैकी आठ ते अकरा पुरुष एकल

पालक आहेत. संयुक्त राष्ट्रसंघातील युनायटेड स्टेटस्मध्ये 1960 पासून एकल पालक संख्येत वाढ झाली आहे. यु. एस. मध्ये 2010 मध्ये 40.7% जन्मदर अविवाहित महिलांचा होता. 2000 मध्ये 11% मुले ज्यांची काही कधीही लग्न झाले नाही अशा सोबत राहात होती. त्यामुळे त्यांच्या सामाजिक, आर्थिक वर्तनात सुद्धा बदल झालेला आढळून येत आहे. त्यामुळे हे बदल सकारात्मक व नकारात्मक स्वरुपाचे असू शकतात.

1.6 एकल पालक कुटुंब आणि जग :

एकल पालक ही अशी व्यक्ती आहे ज्याला मूल किंवा मुले आहेत. परंतु मुलांच्या संगोपनात किंवा समर्थनासाठी सहाय्य करण्यासाठी जोडीदार किंवा लिव्ह इन भागीदार राहत नाही. एकल पालक होण्याच्या कारणांमध्ये घटस्फोट, ब्रेकअप, परित्यक्ता, विधवा होणे, कौटुंबिक हिंसाचार, बलात्कार, एकट्या व्यक्तीद्वारे बाळंतपण किंवा एकल व्यक्ती दत्तक घेणे यांचा समावेश होतो. एकल पालक कुटुंब म्हणजे मुले असलेले कुटुंब ज्याचे नेतृत्त्व एकल पालक करतात. जागतिक पातळीवर एकल पालक पुरुष असलेल्या कुटुंबाचे प्रमाण 3.11% एवढे आहे. जगातील विविध देशातील हे प्रमाण ऑस्ट्रेलिया (10%), कॅनडा (10%), मेक्सिको (10%), युनायटेड स्टेटस् (10%), लिथुआनिया (10%), कोस्टा रिका (11%), लॅटव्हिया (11%) आणि न्युझीलंडमध्ये ते सर्वाधिक (11%) होते. तर जपान (3%), ग्रीस (4%), स्वित्झर्लंड (4%), बल्गेरिया (5%), क्रोएशिया (5%), जर्मनी (5%), इटली (5%) मध्ये ते सर्वात कमी होते आणि सायप्रस (5%), आयर्लंड आणि युनायटेड किंगडम या दोन्ही देशांमध्ये हे प्रमाण 9% होते.

जागतिक पातळीवर एकल पालक कुटुंबाचे नेतृत्त्व आईसुद्धा करत असते. त्याचे प्रमाण 25% च्या दरम्यान आहे. ते एस्टोनिया (9%), कोस्टा रिका (10%), सायप्रस (10%), जपान (10%), आयर्लंड (10%), आणि युनायटेड किंगडम (12%)

मध्ये सर्वात कमी होते. तर नॉर्वेमध्ये ते सर्वाधिक होते (22%), स्पेन (23%), स्वीडन (24%), रोमानिया (25%) आणि युनायटेड स्टेटस् (25%) एवढे आहे.

1.7 एकल पालक कुटुंब आणि भारत :

UN वुमनच्या 2019-2020 च्या अहवालानुसार भारतातील सर्व कुटुंबापैकी 45% म्हणजेच 13 दशलक्ष एकल पालक आहेत. एकल पालक ही संकल्पना तशी जुनीच आहे. एकल पालक होण्यामागील कारण म्हणजे घटस्फोट, घरगुती हिंसाचार, बलात्कार, दुसऱ्या जोडीदाराचा अचानक मृत्यू, एकल वैयक्तिक दत्तक घेणे आणि घटस्फोट, कौटुंबिक हिंसाचार इत्यादी. जे एकल पालक बनले आहेत, त्यांच्यासाठी शांततापूर्ण जीवन व्यतीत करणे सोपे नाही. त्यांच्या जीवनशैलीत विविध अडथळे आहेत जसे की, दु:ख, चिडचिडेपणा, दैनंदिन व्यस्त जीवनशैली, वाद-विवाद इत्यादी. त्याचप्रमाणे परित्याग केलेल्या महिला किंवा पत्नीचा अथवा पतीचा अकाली मृत्यू यामुळे सुद्धा एकल पालकाची जबाबदारी पालकांवर येते. भारतीय समाजात एकल पालक कुटुंबाचे विविध प्रकार पाहावयास मिळतात :

अ) घटस्फोटित माता किंवा वडील :

या प्रकारामध्ये माता आणि पिता एकमेकांपासून वेगळे झाल्यानंतर त्यांच्या मुलांची जबाबदारी त्यांच्यावर येते.

ब) विधवा माता किंवा वडील :

यामध्ये माता किंवा पित्याचा मृत्यू होतो व पाल्याची जबाबदारी त्यांच्यावर येते.

क) एकल पालक माता किंवा पिता :

यामध्ये असे काही पालक आहेत जे घरी एकत्र राहत असले तरी कायदेशीररित्या लग्न झालेले नाहीत आणि त्यांना अविवाहित पालक म्हणून सुचीबद्ध केले आहे.

ड) दत्तक मुले :

या प्रकारामध्ये एकट्या पालक कुटुंबाचे वडील आणि आई हे एखादे मुल दत्तक घेऊन त्याचे पालनपोषण व संगोपन करतात.

1.8 एकल पालक कुटुंबात राहणाऱ्या मुलांचे प्रमाण :

एकल पालक कुटुंबात राहणाऱ्या मुलांमध्ये बहुतेक त्यांच्या आईसोबत राहतात, इतर प्रामुख्याने त्यांच्या वडिलांसोबत तर इतर मुलांमध्ये सामायिक पालकत्व व्यवस्था असते. जिथे ते त्यांच्या दोन पालकांसोबत अंदाजे समान वेळ घालवतात. प्रामुख्याने एकाच पालकांसह राहणाऱ्यांपैकी बहुतेक त्यांच्या आईसोबत राहतात. 2016 मध्ये 6 ते 12 वर्षांच्या मुलांचे प्रमाण प्रामुख्याने त्यांच्या एकट्या वडिलांसोबत राहणाऱ्या विविध देशांमध्ये याचे प्रमाण वेगवेगळे आहे त्यात बेल्जियम (17%), आईसलँड (19%), स्लोव्हेनिया (20%), फ्रान्स (22%), नॉर्वे (23%) आणि स्वीडन (36%) मध्ये ते सर्वाधिक होते तर लिथुआनिया (4%) मध्ये ते सर्वात कमी होते. आयर्लंड (5%), पोलंड (5%), एस्टोनिया (7%) ऑस्टिया (7%) आणि युनायटेड किंगडम (8%), युनायटेड स्टेटस्मध्ये ते (15%) होते. एकल पालक ही संकल्पना 18 वर्षाखालील मुलांना संगोपन करणाऱ्या महिला किंवा पुरुष यांचा समावेश होतो. आजकाल असे दिसून येते की, लोकसंख्येचा एक मोठा भाग घटस्फोटाचे उच्च प्रमाण आणि योग्य वेळी लग्न न करणे, यांसारख्या विशिष्ट परिस्थितीत मुलांची वाढ होत असते.

1.9 एकल पालक कुटुंबाचा पालकवर्गावर होणारा परिणाम :

एकल पालक विविध समस्यांना सामोरे जावे लागते. त्यामध्ये आर्थिक अडचणी, वेळेचे व्यवस्थापन, मुलांचे पालनपोषण करणे, एकटेपणाची जाणीव होणे, स्वाभिमानाचा अभाव, मानसिक समस्या, आरोग्यविषयक समस्या इत्यादी समस्यांना तोंड द्यावे लागते. यामुळे पालकांची मानसिकता स्थिर असू शकत नाही, त्यामुळे चिडचिडेपणा, राग येणे अशा विविध गोष्टी कुटुंबामध्ये घडतात, परिणामी कुटुंबातील वातावरण अस्थिर होऊन ते दुषित होऊ शकते, तसेच याचा परिणाम कुटुंबातील इतर सदस्यांवरही होऊ शकतो. त्यात महिला एकल पालक कुटुंब चालवत असतील तर त्या अविवाहित मातांना मानसिक आरोग्याच्या समस्या, आर्थिक अडचणी, कमी उत्पन्नाच्या क्षेत्रात राहणे, कमी पातळीचे काम करणे, आर्थिक उत्पन्नाचे स्त्रोत नसणे, सामाजिक असमर्थन, नैराश्य अशा अनेक मानसिक, आर्थिक व सामाजिक समस्यांना सामोरे जावे लागते. अशा मातांचे मानसिक आरोग्याचे मूल्यांकन करताना या सर्व बाबीं विचारात घेतल्या जातात. या सर्व बाबी एकल मातांमध्ये मानसिक आरोग्यांच्या समस्यांना कारणीभूत ठरतात. त्यांना विशेषत: उच्च स्तरावरील नैराश्याची लक्षणे असण्याचा धोका अधिक संभवतो.

2. संशोधन विषय :

प्रस्तुत संशोधन विषय “एक पालक कुटुंबाचे समाजशास्त्रीय अध्ययन : विशेष संदर्भ नांदेड शहर” असून एकल पालक कुटुंबाचे सामाजिक व आर्थिक स्थितीचे अध्ययन करण्यासाठी व तसेच त्यांची परिस्थ्गिती, दर्जा, भूमिका यांचे अध्ययन करण्यासासठी तसेच एकल पालक कुटुंबाच्या समस्या, त्यांची कारणे, उपाययोजनांचे अध्ययन करण्यासाठी या विषयाची निवड केली आहे.

3. संशोधनाचे महत्त्व :

एकल पालक कुटुंबातील सामाजिक व आर्थिक स्थितीचे अध्ययन करण्यासाठी हा संशोधन विषय महत्त्वपूर्ण आहे. एकल कुटुंबाची परिस्थिती जाणून घेण्यासाठी सर्व प्रथम कुटुंब व्यवस्था, त्या विषयी माहिती जाणून घेणे गरजेचे आहे. त्यानंतर विभक्त कुटुंबाची कारणे आणि त्यांचा माता-पिता यांच्यावर पडणारा परिणाम तसेच यामुळे एकल पालकाची आलेली जबाबदारी, आव्हाने या साऱ्या गोष्टी पचवून जीवनाची वाटचाल करावी लागते. एकल पालक कुटुंबाचे सामाजिक स्थितीचे अध्ययन करण्यासाठी प्रस्तुत संशोधन विषय महत्त्वपूर्ण आहे ते पुढीलप्रमाणे -

1. जागतिकीकरणाच्या प्रभावामुळे निर्माण झालेल्या नवीन समस्येपैकी एकल पालक कुटुंबाची समस्या आहे. आधुनिक संदर्भाने त्याचे अध्ययन होणे गरजेचे आहे.

2. पारंपरिक समाजातील कुटुंब संस्थेत एकल पालक कुटुंबामुळे बदललेला दर्जा व भूमिकाचे विविध पैलू अभ्यासण्यासाठी हा विषय संशोधनासाठी महत्त्वाचा आहे.

3. एकल पालक कुटुंबामुळे निर्माण झालेल्या पालकांच्या भूमिका संघर्षाच्या अध्ययनासाठी हा विषय महत्त्वाचा आहे.

4. आजचा बालक उदयाचा देश घडविणारा आदर्श नागरिक आहे. त्यामुळे त्याचे निकोप समाजीकरण होणे गरजेचे आहे. त्यासाठी या विषयावर अध्ययन होणे गरजेचे आहे.

5. वर्तमान काळातील विविध प्रमुख सामजिक समस्यांपैकी ही नव्याने निर्माण झालेली एक सामाजिक समस्या आहे. म्हणून या समस्येचा कौटुंबिक,

सामाजिक, धोरणात्मक उपाय योजना करण्याच्या दृष्टीने या विषयावर समाजशास्त्रीय अध्ययन होणे आवश्यक आहे.

4. संशोधनाची उद्दिष्ट्ये :

संशोधनामुळे ज्ञानात वृद्धी होते. सामाजिक घटक आणि सामाजिक तथ्ये यासंबंधी सखोल ज्ञान प्राप्त होते. कोणतेही संशोधन करताना त्यांच्या उद्दिष्टांची पूर्तता होणे आवश्यक असते. संशोधक संशोधन विषयाला अनुसरून उद्दिष्ट्ये समोर ठेऊन संशोधन करतात. प्रस्तुत संशोधन विषय "एकल पालक कुटुंबाचे समाजशास्त्रीय अध्ययन : विशेष संदर्भ नांदेड शहर" या विषयाची उद्दिष्ट्ये निश्चित करण्यात आली आहेत ती खालीलप्रमाणे :

1. आधुनिक काळातील परिवर्तनामुळे निर्माण झालेली एकल पालक कुटुंबाचे स्वरूप अभ्यासणे.
2. एकल पालक कुटुंबातील संरचनात्मक परिवर्तन अभ्यासणे.
3. एकल पालक कुटुंबामुळे निर्माण झालेल्या कुटुंब संरचनेच्या कार्यात्मक बदलांचा अभ्यास करणे.
4. एकल पालक कुटुंबामुळे निर्माण झालेल्या कौटुंबिक, मानसिक, सामाजिक व आर्थिक समस्यांचा अभ्यास करणे.
5. एकल पालक कुटुंबाच्या समस्यांचे अध्ययन करून त्या दूर करण्यासाठी उपाययोजना सुचविणे.

5. संशोधनाची गृहितके :

संशोधकाने आपले संशोधन कार्य पूर्णत्वास नेण्यासाठी व त्या संशोधनाला मार्गदर्शन करण्यासाठी गृहितकृत्यांचा उपयोग होतो. संशोधनाला योग्य दिशा

देण्याचे काम गृहितकृत्याद्वारे करण्यात येते. कोणत्याही समस्येचे वैज्ञानिक पद्धतीने अध्ययन करणे गरजेचे असते. त्यासाठी संशोधकाला त्या विषयाचे अध्ययन असणे आवश्यक आहे. संशोधन विषयासंबंधी असणाऱ्या पूर्वज्ञानाच्या आधारे तसेच त्याने त्या विषयाच्या विविध पैलूंच्या आधारे केलेले अध्ययन संशोधक आपल्या संशोधन समस्येच्या निराकरणासाठी संभाव्य उत्तरे शोधतो आणि त्याच्याआधारे तो सिद्धांताची मांडणी करतो. या संभाव्य उत्तरांनाच गृहितके असे म्हणतात.

प्रस्तुत संशोधन विषय "एकल पालक कुटुंबाचे समाजशास्त्रीय अध्ययन : विशेष संदर्भ नांदेड शहर" या विषयाची गृहितकृत्ये पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात आली आहेत.

1. जागतिकीकरणामुळे एकल पालक कुटुंबाची समस्या निर्माण झाली आहे.
2. एकल पालक कुटुंबामुळे कुटुंबाच्या सामाजिक रचनेत आमुलाग्र बदल झालेला आहे.
3. एकल पालक कुटुंबामुळे कुटुंबाच्या कार्यात लक्षणीय बदल झालेला आहे.
4. एकल पालकास कौटुंबिक, मानसिक, सामाजिक, आर्थिक अशा विविध समस्यांना प्रकर्षाने सामोरे जावे लागत आहे.
5. एकल पालक कुटुंबामुळे बालकांच्या समाजीकरणात उणिवा निर्माण होत आहेत.

6. संशोधन विषयाची व्याप्ती व कालावधी :

6.1 संशोधन विषयाची व्याप्ती :

संशोधन विषयाची व्यापती व कालावधी निश्चित केल्याशिवाय संशोधनाला साचेबद्ध चौकटीत बांधता येत नाही व योग्य निष्कर्षापर्यंत पोहोचता येत नाही. म्हणून प्रस्तुत संशोधन विषय हा व्यापक आहे. याची व्याप्ती विशाल असून संपूर्ण

देशातील किंवा महाराष्ट्रातील एकल पालक कुटुंबाचे समाजशास्त्रीय अध्ययन न करता फक्त नांदेड शहराची निवड करण्यात आली. 'नांदेड शहर' हीच या संशोधनाची व्याप्ती आहे.

6.2 संशोधन अध्यापनाचा कालावधी :

संशोधन करताना संशोधनाचा कालावधी ठरविणे अत्यंत महत्त्वपूर्ण असते. योग्य कालावधीत नियोजितपणे संशोधन केल्यास संशोधनास योग्य दिशा प्राप्त होऊन वेळेचा अपव्यय होत नाही व संशोधकाला वेळेची मर्यादा लक्षात घेऊन जलद काम करण्यास प्रेरणा मिळते. प्रस्तुत संशोधन विषयाच्या अध्ययनासाठी 3 वर्षाचा कालावधी निश्चित करण्यात आला आहे. तो खालीलप्रमाणे :

अ.क्र.	संशोधन कार्याचे स्वरूप	निश्चित कालावधी
1.	संबंधित साहित्याचा आढावा घेऊन प्रस्ताव तयार करणे.	6 महिने
2.	संशोधन अभ्यास व प्रश्नावली तयार करणे.	6 महिने
3.	मुलाखत अनुसूची पूर्ण करणे.	6 महिने
4.	माहितीचे विश्लेषण करणे निष्कर्ष व शिफारशी करणे.	6 महिने
5.	अंतिम संशोधन आराखडा सादर करणे.	6 महिने
6.	शोधप्रबंध सादर करणे	6 महिने

7. संशोधन पद्धती :

कोणत्याही विषयाचा पद्धतशीर अभ्यास करणे म्हणजे शास्त्र होय. कोणत्याही विषयाला शास्त्र म्हणून ती मान्यता प्राप्त होते, ती मान्यता विषयामध्ये

घटक कोणते यावर अवलंबून नसते तर ते शास्त्रीय अभ्यास पद्धतीने तेही कशाप्रकारे हाताळता यावर अवलंबून असते. अध्ययन करणे हा संशोधनाचा महत्त्वाचा उद्देश असतो.

प्रस्तुत संशोधन कार्यासाठी संशोधकाने समस्येला अनुसरून योग्य संशोधन पद्धतीने निवड करणे गरजेचे असते. यामुळे संशोधन कार्य योग्य दिशेने कार्यान्वित होते. या संशोधन कार्यासाठी संशोधकाने सर्वेक्षणात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात येईल. संशोधन पद्धतीमध्ये पुढील मुद्यांचा समावेश आहे.

7.1 संशोधन आराखडा :

संशोधन आराखडा ही शास्त्रीय सामाजिक संशोधनातील प्रमुख पायरी आहे. कोणतेही कार्य पार पाडण्यासाठी सव्रप्रथम त्या कार्याचा आराखडा तयार करावा लागतो. संशोधकाला त्या कार्याचे पद्धतशीर नियोजन, त्याची रूपरेषा आणि मांडणीचे स्वरूप निश्चित व स्पष्ट करावे लागते. संशोधनाला सुरुवात करण्यापूर्वी संशोधकाला प्रथमत: संशोधनाचा आराखडा तयार करावा लागतो. त्यात संशोधनाचा विषय, उद्देश, अध्ययन क्षेत्र, कालावधी संशोधनासाठी आवश्यक असणारी माहिती संकलित करणे, तिच्या संकलनाच्या पद्धती निश्चित करणे, नमुना निवडणे, तथ्य संकलनाची साधणे ठरविणे, तथ्यांचे विश्लेषण, संशोधन कार्याचा खर्च इ. बाबी संशोधकाला ठरवाव्या लागतात.

प्रस्तुत संशोधन विषय “एकल पालक कुटुंबाचे समाजशास्त्रीय अध्ययन : विशेष संदर्भ नांदेड शहर” या विषयाचा अभ्यास करण्यासाठी संशोधकाने **“वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन आराखड्याचा”** उपयोग केल्या जाणार आहे.

7.2 नमुना निवड :

सामाजिक संशोधन करण्यासाठी गृहितकृत्ये आणि संशोधन आराखडा तयार केल्यानंतर संशोधकाला नमुना निवड पद्धती माहिती करून घेणे आवश्यक असते. नमुना निवड विस्तृत घटकांमधून लहान गटाची निवड केल्या जाते याला नमुना निवड म्हणतात.

प्रस्तुत संशोधन विषय "एकल पालक कुटुंबाचे समाजशास्त्रीय अध्ययन : विशेष संदभ्र नांदेड शहर" या विषयासाठी नांदेड शहरातील एकूण 83 प्रभागापैकी सर्व प्रभागातून सम प्रमाणात नमुन्याची निवड करण्यात येणार आहे. त्यातून **"सहेतूक नमुना निवड पद्धतीचा"** उपयोग करून प्रत्येक प्रभागातून 3 उत्तरदात्यांची निवड केली जाणार आहे. अशा एकूण 249 उत्तरदात्यांची निवड करून तथ्य संकलनाचे कार्य केले जाणार आहे.

7.3 तथ्य संकलनाची तंत्रे :

सामाजिक संशोधन तथ्य संकलनाच्या पद्धतीस अत्यंत महत्त्व आहे. कारण सामाजिक, घटनांचे अध्ययन करूनच त्या घटनासंबंधीच्या तथ्यांचे संकलन केले जाते. तथ्य संकलनाचे प्रामुख्याने दोन प्रकार पडतात. पहिले प्राथमिक स्त्रोत व दुसरे म्हणजे दुय्यम स्त्रोत होय. प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक व दुय्यम स्त्रोतांचा वापर करण्यात येणार आहे. संशोधक आपल्या संशोधन क्षेत्रात जाऊन संशोध्य समस्येशी संबंधित असणाऱ्या व्यक्तीशी संपर्क साधून प्रश्न विचारून मुलाखतीद्वारे माहिती संकलित केल्या जाते.

संशोधक प्राथमिक तथ्य संकलनाच्या विविध तंत्रापैकी **मुलाखत अनुसूची** या प्राथमिक तंत्राचा वापर करून तथ्य संकलन करणार आहेत. तसेच संशोधन अध्ययनासाठी निरीक्षण तंत्राचा देखील उपयोग केला जाणार आहे. प्रस्तुत संशोधन विषयात विषयाशी निगडीत पुस्तके, साप्ताहिक, आकडेवारी, वर्तमानपत्रे,

शोधप्रबंध, इंटरनेट इ. दुय्यम साधनांचा वापर करण्यात येईल तसेच त्या अनुषंगाने निरीक्षण या तंत्राचा देखील उपयोग केला जाणार आहे.

7.4 तथ्य विश्लेषण व अर्थनिर्वचन :

तथ्य विश्लेषण हा संशोधन प्रक्रियेतील महत्त्वपूर्ण घटक आहे. प्राप्त माहितीचे व्यवस्थित स्पष्टीकरण केल्याशिवाय माहितीचा बोध होत नाही. संशोधन समस्येच्या संकलित तथ्यांचा विचार करून त्यांचे विश्लेषण केले जाते.

प्रस्तुत संशोधनात संशोधक मुलाखत अनुसूचीद्वारे प्राप्त झालेल्या तथ्यांचे वर्गीकरण, सारणीकरण, अर्थनिर्वचन करून तथ्यांचे सहसंबंध स्पष्ट करणार आहे. त्याशिवाय संशोधनाचे अपेक्षित उद्दिष्ट पूर्ण होणार नाही म्हणून प्राप्त तथ्यांचे वर्गीकरण, अर्थनिर्वचन करण्यात येणार आहे.

8. संशोधन अहवालाची मांडणी :

संशोधन विषयाच्या अहवालाची मांडणी ही त्या संशोधनाची महत्त्वपूर्ण पायरी असते. कोणतेही संशोधन हे संशोधन अहवालामुळेच पूर्णत्त्वास जाते. **"एकल पालक कुटुंबाचे समाजशास्त्रीय अध्ययन : विशेष संदर्भ नांदेड शहर"** या संशोधन विषयाच्या अहवाल मांडणीमध्ये एकूण पाच प्रकरणांचा समावेश असेल. ती प्रकरण मांडणी खालीलप्रमाणे असेल.

प्रकरण पहिले	**: प्रस्तावना**
प्रकरण दुसरे	**: संबंधित साहित्याचा आढावा**
प्रकरण तिसरे	**: संशोधन पद्धती**
प्रकरण चौथे	**: माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन**
प्रकरण पाचवे	**: निष्कर्ष व शिफारशी**

संदर्भसूची :

1. आगलावे प्रदीप (2000), *"सामाजिक संशोधन पद्धती"*, नागपूर, साईनाथ प्रकाशन.

2. बोधनकर सुधीर, अलोनी विवेक (2007), “सामाजिक संशोधन पद्धती”, नागपूर, श्री साईनाथ प्रकाशन
3. लुंडबर्ग जे.ए. (1945), “सोशल रिसर्च”, न्युयॉर्क मॅकग्राहिल
4. गुड हॅट (1961), “मेथड इन सोशल रिसर्च”, मॅकग्राहिल इंटरनॅशनल कंपनी.
5. यंग पी.व्ही. (1960), “सायटिफिक सोशल सर्वे अॅण्ड रिसर्च”, नवी दिल्ली, प्रिटिंग हॉल ऑफ इंडिया प्रायव्हेट लिमिटेड
6. www.nandeies.com
7. www.vvvvvv.knew.ud.
8. m.r.auora.com
9. www.mddreshog.com
10. www.mr.everdoh.com
11. www.mr.m.wikipedia.org

:: संशोधक ::   :: संशोधक मार्गदर्शक ::

साईनाथ सटवाजी कुंभारे